# भारत की कम्युनिस्ट पार्टी(माओवादी)
# COMMUNIST PARTY OF INDIA(MAOIST)

---

## सिरीया जर दोषी तर मनमोहनसिंग क्रिमीनल!

*आपल्याच देशवासीयांवर रासायनीक हत्यारांचा वापर करणाऱ्या मनमोहनसिंगाना सजा द्या!*

सिरीया मध्ये रासायनीक हत्यारांचा वापर केल्याबद्दल त्या देशांवर हल्ला करण्यास अमेरीका उतावळा झाला आहे. त्याच्या ग्लोबेल प्रचाराला युरोपातील काही देशांनी साथ दिली. भारताचे पंतप्रधान मनमोहनसिंगाने रासायनीक हत्यारांच्या वापराबाबत अमेरीकेच्याच म्हणण्याला होकार दिला व हल्ला करण्याबाबत रशियाच्या बाजुने राहीला. या रासायनीक हत्याराच्या वापराच्या विरोधात असण्याची भाषा बोलतो तोच मनमोहन सिंग स्वतःच्या देशवासीयांवर रासायनीक हत्यारांचा सर्रास वापर करीत आहे. सिरीयाचे असद शासन जर दोषी आहे तर मनमोहनसिंगही शिक्षेस पात्र आहे. भारतात साम्राज्यवादी दलालांच्या सत्तेच्या मुलभूत जनतेने कधीही स्विकारले नाही. त्यांच्या सत्तेच्या स्थापनेपासुनच देशातील जनता संघर्ष करीत आहे. कित्तेक देशव्यापी जनआंदोलने जनतेने करुन आपला हा विरोध सतत तेवत ठेवला आहे. हे जनआंदोलन आता ठोस व्युहरचनात्मक दिशेने नवलोकशाही क्रांती स्थापन करण्याचे लक्ष्य घेवून अग्रेसर होत आहे. तिव्र फासिवादी दमनाचा मुकाबला करीत जर आंदोलनाला जिवंत ठेवायचे असेल तर सशस्त्र संघर्षाशिवाय पर्याय नाही हे ओळखुनच भारतीय जनतेने संघर्षाचे हे स्वरुप स्विकारले आहे. व गत 44 वर्षापासुन हा लढा जनतेच्या हृदयाच्या ठोक्याप्रमाणे निरंतर चालुच आहे. भारत सरकाराने आजवर एकाहुन एक असे क्रूर दमन जनतेवर केले आहे पण ते या क्रांतिकारी आंदोलनाला दाबू शकले नाही. त्यामुळे पिसाळलेल्या सरकारने आता रासायनिक हत्याराचा वापर करणे सुरु केले आहे. याचा ठोस पुरावा या वर्षी पोलिसांनी गडचिरोली जिल्हयात एकतर्फी हल्ला करुन क्रांतिकारी जनतेची मोठया प्रमाणावर हत्या केली यांत दिसुन आला. तेंव्हा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार आता मनमोहनसिंग व त्याच्या सरकाराला सजा देण्यास ओबामा पुढे येतील काय?

माओवादी हे याच देशाचे नागरीक आहेत. गडचिरोलीतील आदिवासी जनताही भारताचीच नागरीक आहे. मनमोहनसिंगाच्या नेतृत्वातील संयुक्त प्रगतीशिल गठबंधन (युपीए–2) सरकारने ऑपरेशन ग्रीन हंट नावाने भारताच्या जनतेविरुध्द युध्द छेडले आहे. माओवादी असो वा नसो, ग्रामीण असो की शहर असो, जनसंघर्ष असो कि सशस्त्र संघर्ष असो, भुख हडताल असो की कॅडल मार्च असो, भाषणाव्दारे साधी टीप्पणी असो की टीकात्मक एखादे कार्टुन असो सरकार जराही विरोध सहन करणार नाही. सरकारचा विरोध करण्याचा विचार जरी मनात आणला तरी तो देशाला धोका ठरतो. अशी ही जगातील सर्वात मोठी लोकशाही भारतात नांदत आहे. व तिला आपली रखेल बनवुन मनमोहनसिंग मिरवित आहे. यांच्या लोकशाहीचा पायंडा असा आहे कि त्याच्याच निर्देशाने व अंतिमता त्यांच्याच आटोक्यात येईल असा योजनाबध्द त्यांनीच नावासाठी घडवुन आणलेला विरोध लोकशाहीचे सॅपल म्हणूनही सादर करीत असतात. लागलिच काही दिवसांनी हे विरोधक मंत्री पदावर, महामंडळाच्या अध्यक्ष पदावर, शिक्षण संस्थेचे मालक, बिना जमानती

करोडो बॅंक कर्जाचे धनी, किंवा सत्कार करुन प्रतिष्ठित बणवून इनामी समाज सेवक म्हणून प्रसिध्दी झोतात दिसु लागतात. आणि हा सर्व खेळ करतांना जनतेचे प्रश्न, दारीद्र याचा भरपुर वापर करतात. गडचिरोलीत तर अशा इनामी सरकारी समाज सेवकांचा सुळसुळाट आहे. या तथाकथित समाज सेवकांच्या डोळ्यादेखत जिल्हयात आदिवासींच्या कत्तली होत आहे, त्यांच्यावर रासायनीक हत्यारांचा सर्रास वापर करण्यात येत आहे पण यावर हे इनामी समाज सेवकांना याचे काही घेणे देणे नाही. त्यांची तोंडे सरकारी सवलतीच्या फेविकाल ने बंद केले आहेत.

गेल्या आठ महिण्यात पोलीसांनी हत्या केलेले सर्वच्या सर्व आदिवासी होते. गडचिरोलीसाठी ऑपरेशन ग्रीन हंट हे आदिवासींची सफाया मोहीम आहे. बंदुकिच्या गोळ्या कमी पडतात की काय म्हणून आता आदिवासींना ठार करण्याकरीता रासायनीक हत्यारांचा वापर सुरु केला आहे. यातुन एक बाब स्पष्टपणे दिसत आहे की ही सरकारच्या पराजयाची घंटा आहे. दिनांक 12 एप्रील गडचिरोली जिल्हयातील धानोरा तालुक्यातील सिंदेसुर गावाजवळील पोलिसांनी घडवून आणलेली चकमक ज्यात 7 जण शहिद झाले. यात दोन गावकरी व पाच जनसंघटक होते जे माओवादी क्रांतीकारी होते. पैकी 5 जण बंदुकिच्या गोळीने ठार झाले, पण दोन जणांच्या शरिरावर बंदुकिच्या गोळीची एकही जखम नाही. यांत एक गावकरी मुकेश होता व एक कॉमरेड चंपा या दोघांचा मृत्यू कसा झाला हे गुढ़ होते? प्रत्यक्ष फायरींगच्या वेळी असलेल्या पीएलजीए योद्धयांनी जेंव्हा संपुर्ण रिपोर्ट कमेटीला दिला तेंव्हा ती धक्कादायक आपबिती ऐकुन आम्ही अवाक् झालो. ते म्हणजे. फायरिंगच्या वेळी अचानक पणे सर्वांना दम येणे, उलटी होणे, डोके दुखने, एलर्जी होणे, स्वास घेण्यास त्रास होणे किंवा गळ्यामध्ये त्रास होवून खोकला येणे सुरु झाले. प्रथम दर्शनी आम्ही याला धुळीमुळे हे झाले असावे असे समजलो. पण जेंव्हा 19 मे ला याच जिल्हयातील हेट्टेडकसा येथे परत पोलिसांसोबत चकमक झाली तेंव्हा यावेळी सुध्दा अशाच प्रकारे दम भरुन येणे, गळा खराब होणे व स्वास घेण्यास त्रास होणे सुरु झाले व यांत असलेल्या सर्व जनयोद्धयांना हे व्हायला लागले तेंव्हा यांत सामिल असलेल्या पीएलजीए कमांडर ने काळजीपुर्वक लक्ष दिले असता समजले की पोलीस असे काही बॉम्ब फेकीत आहे जे वरच्या वर विस्फोट होत आहे, अश्या काही विशिष्ट गोळया झाडत आहे त्यानंतर हे असे त्रास होणे सुरु होत आहे. तसेच ज्या बाजूला फायरींग झाली नाही त्या कॉमरेडसनां मात्र असा त्रास जाणवला नाही. या घटनेनंतर मात्र हे स्पष्ट झाले की पोलीस रासायनीक हत्यारांचा वापर करायला लागले आहेत. ''तेंव्हा सिंदेसुर घटनेतील त्या दोन मृत्युंच्या गुढ कारणाची उकल होते की हे मृत्यु रासायनीक हत्यारांच्या वापरामुळे झाले आहे.'' या दोन्ही घटनेत सामिल असलेले कॉमरेड कित्तेक दिवस स्वासोच्छवासाची तक्रार करीत होते. त्यांना पीएलजीए तील जनडॉक्टरांनी त्यांना उपचार करुन बरे केले. आता हे सुर्यप्रकाशासारखे स्पष्ट झाले आहे की भारत सरकार व त्याच्या जोडीला महाराष्ट्र सरकार संगनमताने सर्रास रासायनीक हत्यारांचा वापर करीत आहे. जे मानवतेला काळीमा फासणारे कृत्य आहे. मानवते विरुद्ध घोर अपराध आहे. कोण जाणे असा रासायनिक हत्यारांचा वापर देशात काश्मिर, उत्तर पुर्व आणि शहरांत सुध्दा रॅली मोर्चे व निदर्शनांना पांगविण्यात करण्यात येत नसणार? कारण या दिशेने कोणी लक्ष्य दिले तरच सरकारचे पितळ उघडे पडेल. आम्ही देश व जगातिल न्यायप्रिय जनतेला व बुध्दिजीवींना अपिल करतो की त्यांनी जनाभिमुख असणाऱ्या केमिकल विशेशज्ञां व मानव अधिकार कार्यकत्यांच्या मार्फत गडचिरोली पोलिसांच्या दारुगोळा गोदामांची निष्पक्ष चौकशी करावी सत्य आपोआप बाहेर पडेल. त्यांचा रासायनिक हत्यारांचा आणि मोठे संहारक हत्यारांचा प्रचंड साठा आपोआप दर्शवेल की सरकार ने जनतेविरुध्द युध्द छेडले आहे.

हत्या करणे व रक्ताने माखलेल्या छिन्न विछिन्न देहांचे फोटो काढून त्यांचे फ्लेक्सी बॅनर बणवुन गावागावांत लावुन व्यापक दहशत पसरविणे व त्यावर गडचिरोली पोलीसांची अधिकृत मोहर लावणे हे

मानवतेला लाजविणारे कृत्य आहे. ही मानसिकता ओरडून सांगत आहे की माणसांची या सरकारला काही किमंत नाही. आदिवासी त्याच्याकरीता मानव नाही तर जंगलातील जनावरे होय ज्यांची शिकार करुन ते स्वतःला गौरन्वित आहेत. मेडरी मध्ये शहिद झालेल्या महिला कार्यकर्त्यांचे मृतदेहाचे फोटो पाहुन जनता टाहो फोडून रडत आहे. जे कधीही आंदोलनात नाही त्यांच्या काळजालाही पाझर फुटत आहे पण पोलीस मात्र मंत्रीसमवेत फाईव्ह स्टार पार्ट्या आयोजित करुन आनंद साजरा करीत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चौहान व गृहमंत्री आर. आर. पाटील आपल्याच नागरिकांचे मुडदे पाडल्या बद्दल त्यांना बक्षीस देत आहे. या दलाल शासकांचे सिंहासन आदिवासींच्या मृतदेहावर उभे ठाकले आहे. हे मानवतेलाही लाजविणारे कृत्य आहे.

खुल्लमखुल्ला गोळीने उडवून देण्याची भाषा बोलणारे पोलीस अधिक्षक सुवेज हक यांना कोणत्या संविधानाने हा हक्क दिला? माओवादी असो की बंदुकधारी कोणीही असो देशातील कोणत्याही नागरिकांची हत्या करण्याचा कोणाला अधिकार आहे काय? राजकिय विरोधकांची हत्या करणे हे सरकारचे धोरण आहे. राजकिय विरोध फिजीकल ॲनिलेशन करुन संपविण्याचे प्रयत्न केले जात आहे. हे लोकशाही नाही मध्ययुगीन क्रूर शाशन व्यवस्थेचे लक्षण आहे.महामानवाने गोर गरिब, दलित, आदिवासी व पिडीतांना न्याय मिळावा या आशेने लिहीलेल्या संविधानाला भांडवली बाजारात नग्न केल्या जात आहे. पाचव्या अनुसुचीचे उल्लंघन करीत संविधानाला पायदळी तुडवित असतांनाही याला आदिवासींचा विकास म्हणविल्या जात आहे हा निर्लज्यतेचा कळस आहे. हे असे कृत्य संपुर्ण देशभर सुरु आहे. केवळ माओवादींच्याच नेतृत्वाचा विचार केला तरी 3 लाखावर पोलीस व अर्ध सैनिकबलांना या क्षेत्रातील जनतेवर मनमानेल तसे अत्याचार करण्यासाठी सोडले आहे. आदिवासींना जंगलातुन हाकलुन लावणे किंवा त्यांच्यावर एवढी दहशत करणे की ते इतके भयभित झाले पाहिजे की केवळ आपले प्राण वाचेल की नाही याचाच विचार त्यांनी केला पाहिजे. जल–जंगल–जमिन आणि सन्मानाने जगण्याचा विचार त्यांनी मनातही आणता कामा नये असे घोर फासिवादी आक्रमण येथील जनतेवर सरकार द्वारे केल्या जात आहे. यालाच जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणायचे काय?.

भारतिय दलाल शासकांनी स्विकारलेले साम्राज्यवादी नवउदारवादी धोरण देशाला अधोगतीस नेत आहे. संसाधने आणि संप्रभूता केव्हांचीच विदेशी कंपन्याच्या हाती गेली आहे. उपभोगतावादी दलाली संस्कृतीचा फैलाव एवढा नसांनसात भिनविल्या गेला आहे कि मानवी मुल्य व सामाजीक विचारांची पायमल्ली करतांना जराही लाज वाटत नाही. उलट एका तबक्यात याला विकास समजल्या जात आहे. आपलं फावलं आहे दुसऱ्यांच्या पेक्षा आपण बरे आहोत या सामाजीक डार्विनीजमला जोपासल्या जात आहे. अशात आदिवासीं व दलितां विषयींची तळमळ ही कित्तेक मैल लांबची बाब ठरली आहे. उलट आदिवासींच्या दारीद्र्याचे देखील भांडवल करुन अमाप पैसा व पुरस्कार कमविण्याचा धंदा काही इनामी समाज सेवक एनजीओच्या माध्यमातुन करीत आहेत. आदिवासींच्या मृतदेहांचा स्कोअर जो अधिकारी जास्त वाढवेल तो या लोकशाहीत हिरो ठरत आहे. अरबो रुपयाचा भ्रष्टाचार करीत स्वतःची तिजोरी भरणारे दलाल नेते, देशाच्या उद्योगांना कवडीमोल दराने विदेशी कंपन्यांना विकत आहे. जल, जंगल व जमिन विकल्या जात आहे. संपुर्ण देशच विकायला काढला आहे. ही विक्री करणारा बेस्ट दलाल पंतप्रधान मनमोहनसिंग जनतेवर रासायनिक हत्यारांचा वापर करीत आहे. जंगलाशिवाय आदिवासी नाही व आदिवासींशिवाय खऱ्या अर्थाने जंगल वा जंगलातील पशु पक्षी व जैविकतेचे रक्षण शक्य नाही. व या दोघंच्या रक्षणार्थ, सरकारच्या अघोरी लुट व दमना विरोधात, आपल्या प्राणांची आहुती देत माओवादी गुरिल्लांनी मानवी चिन भिंत उभी केली आहे. ज्याला पार करणे या सरकारला शक्य होत नाही करीता हे रासायनिक हत्याराचे घृणास्पद व क्रूर आक्रमनण जनतेवर जारी केले आहे. या हल्लेखोर मोहनसिंग, पृथ्वीराज चौहान, आर.आर.पाटील व संबधित

अधिकाऱ्यांना शिक्षा मिळालीच पाहिजे. मनमोहन सिंग स्वतः आपल्याच जनतेवर रासायनीक हत्यारांचा वापर करणारे गुन्हेगार आहेत. यांना सिरीयावर बोलण्याचा काही अधिकार नाही हे शिक्षेचे हकदार आहेत. यांनी मानवते विरुध्द अपराध केला आहे यांना शिक्षा झालीच पाहीजे. जगातील जनतेचा नंबर एक चा दुश्मन असलेला अमेरीका कितीही सिरीयावर बोंबा मारीत असला तरी भारतात माओवादीवर रासायनीक हत्यारांचा वापर करण्याची निती ही अमेरीकेचीच आहे. सिरीयात लोकशाही करीता सशस्त्र आंदोलन करणारे जर न्यायपुर्ण आहेत तर भारतातही नवलोकशाही करीता गेल्या 44 वर्षापासुन माओवादी क्रातिकारी आंदोलन चालवित आहे. ते भारताला कसा काय धोका ठरतात? ओबामा व भारतातील दलाल शासकांनी स्वतःच्या अंतरंगात झाकले पाहीजे, हे दुतोंडे आहेत, मतलबी आहेत. यांच्यात कवडीचीही इमानदारी नाही, यांच्या विचारात मानवि मुल्यांना कवडीचीही किमंत नाही. जनतेचे भले व विकासाच्या नाव पुढे करुन आपला लुट व दमनाचाच एजेंडा पुढे चालवित असतात. भूक, बिमारी, अशिक्षेचे भांडवल करीत असतात मात्र आर्थिक संकटातुन बाहेर निघण्यास काही जनतेला संपवावे लागेल या मनमोहनामिक्स, ओबामिक्स अर्थात रिगन–थॅचेरिजम च्या नवउदारवादी धोरणांनातील सिध्दान्ताला राबवित असतात. जनतेवर रासायनिक हत्यारांचा वापर हा याच धोरणांचापरिपाक आहे. अशांना खाली खेचुन शिक्षा ठोठावणे हे देशभक्तीचे व मानवतेचे पुण्यकार्य आहे. करीता देशातील नौजवानांना, ज्यांच्यात अजुनही माणुसकी जिवंत आहे त्या नागरीकांना, खऱ्या लोकशाहीवादींना आवाहन करतो की त्यांनी जनतेवरील या युध्दाच्या विरोधात व विशेसकरुन रासायनिक हत्यारांच्या वापराच्या विरोधात संघर्ष करावा व मानवते विरुद्ध अपराधी असणाऱ्या या शासकांस जनतेच्या न्यायालयात खेचुन शिक्षा करावी.

दिनांकः 21 सप्टेंबर 2013

कॉ. सह्याद्री

सह्याद्री

सचिव, महाराष्ट्र राज्य कमेटी